## I. About Us

### i. Overview:

माझा मराठाचि बोलु कौतुकें /परि अमृतातेंही पजौं जिंके /ऐसीं अक्षरे रसिकें /मेळवीन //

मराठी विभाग



महाविद्यालयात सन- १९७८पासून मराठी विभाग कार्यरत आहे .मराठी विभागाच्या स्थापनेवेळी विभागप्रमुख म्हणून डॉ.कल्याणी दिवेकर यांनी काम पाहिले .महाविद्यालयाच्या कला, वाणिज्य, विज्ञान या सर्व विद्याशाखांमध्ये मराठी विषयाचे अध्यापन केले जाते .विभागाच्यावतीने स्वयंपूर्ण, नावीन्यपूर्ण व कौशल्यपूर्ण अशा अभ्यासक्रमांची निर्मिती करत असताना चॉइस बेस्सड क्रेडिट सिस्टम )सीबीसीएस (ही शिक्षण प्रणाली अत्यंत प्रभावीपणे राबवली आहे .या विभागातील अभ्यासक्रमहीआजपर्यंत अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण राहिला आहे .त्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र-आत्मचरित्र या साहित्यप्रकारांबरोबरच वृत्तांत लेखन, मुलाखत लेखन, प्रसारमाध्यमे, ग्रंथ परिक्षण, स्मरणिका संपादन, मुद्रित शोधन, उपयोजित मराठी अशा अभ्यास पत्रिकांचा समावेश केला आहे.

विभागाच्यावतीने भाषा व साहित्य संबंधित महत्त्वाच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये चर्चासत्र, कार्यशाळेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील अनेक नामवंत लेखक कवींना आमंत्रित करण्यात येते .त्यामध्ये आजवर शांता शेळके, वसंत बापट, विठ्ठल वाघ, श्रीपाल सबनीस, अरुणा ढेरे, रामचंद्र देखणे, उमा कुलकर्णी, सदानंद मोरे, भारत सासणे, मिलिंद जोशी, अशोक नायगावकर, अरुण कोल्हटकर या प्रतिभावंत लेखकांना आमंत्रित करण्यात आले होते.

भाषिक आणि वांग्मयीन कौशल्ये विकसित करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी हा विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे .सन-२०१० पासून डॉ.सदाशिव पाटील हे या विभागात मराठी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत.